स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
ज्ञानतीर्थ विष्णुपूरी, नांदेड

मानव विज्ञान **विद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील विद्यावाचस्पती**
(पीएच.डी.) पदवीसाठी प्रबंधाचा सारांश

‘‘हदगाव व अर्धापूर तालुक्यातील लोकसंख्या व वसाहतींचा भौगोलिक अभ्यास (२००१-२०२१)’’

संशोधक
नरवाडे मदन विठ्ठलराव
(M.A., B.Ed., NET)
कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण वरिष्ठ महाविद्यालय, धर्मापूरी
ता. परळी (वै.) जि. बीड

मार्गदर्शक
डॉ. गौंड नामदेव संपतराव
(M.A., B.Ed., M.Phil., Ph.D.)
सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, चाकूर जि. लातूर

संशोधन केंद्र
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर
ता.अहमदपूर जि. लातूर-४१३५१५

जुलै-२०२१

प्रस्तावना :

प्राचीन काळापासून लोकसंख्या व लोकसंख्येची वैशिष्ट्ये या विषयीचे औत्सुक्य लोकांच्या मनात असल्याचे काही दाखले आपल्यालाला इतिहासात सापडतात. ख्रिस्तपूर्व ३२१ ते २६९ या काळात लिहिलेल्या 'कौटिलीय अर्थशास्त्र' नामक भारतीय ग्रंथात तसेच 'आईन इ. अकबरी' या ग्रंथात देखील लोकसंख्या विषयक विवेचन केलेले आहे. परंतु लोकसंख्येच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाचा पाया घालण्याचे श्रेय मात्र 'जॉन ग्रँट' (१६२०-७४) या ब्रिटिश संशोधकाकडे जाते. अलिकडे लोकसंख्या या घटकावर विश्व, देश, राज्य व स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये देखील स्थानिक पातळीवर नांदेड जिल्ह्यातील 'हदगाव व अर्धापूर' तहसील क्षेत्रातील लोकसंख्याशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला जाणार आहे. ज्यामध्ये अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येचे वितरण, वितरणावर परिणाम करणारे घटक, लोकसंख्येची घनता, लिंग गुणोत्तर, साक्षरतेचे प्रमाण इत्यादी घटकांबरोबरच अभ्यास क्षेत्रातील वसाहतींचा अभ्यास केला जाणार आहे.मानवाला जगण्यासाठी अन्नाइतकीच निवासाची देखील गरज असते. बदलत्या हवामानापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि सामाजिक जीवन उपभोगण्यासाठी मानव घरे बांधतो आणि वसाहती वसवितो. त्या-त्या भागातील लोकसंख्या जसजशी वाढत जाते तश्या वसाहती पण वाढत जातात. प्राकृतिक व मानवनिर्मित सोयी-सुविधांच्या अनुकूलतेनुसार या वसाहती वाढत जातात.प्रस्तुत संशोधनामध्ये 'हदगाव व अर्धापूर' तालुक्यातील वसाहतीचा वेगवेगळ्या अनुषंगाने अभ्यास केला जाणार आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने वसाहतीचा उद्गम व विकास, वसाहतीचे वितरण, वर्गीकरण, प्रकार व प्रारुप व इतर वैशिष्ट्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जाणार आहे.

१.२ अभ्यास क्षेत्र :अभ्यासक्षेत्राची पूर्ण विचारांती निवड करतांना हा विषय या अगोदर संशोधनासाठी

घेतलेला नाही. याचा विचार केला गेलेला आहे. लोकसंख्याशास्त्रीय व वसाहतीचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील ‘हदगाव व अर्धापूर’ हे तालुके अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहेत. ‘‘हदगाव व अर्धापूर तालुक्यातील लोकसंख्या व वसाहतींचा भौगोलिक अभ्यास’’ या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. ‘हदगाव व अर्धापूर’ हे नांदेड जिल्हा व महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण आहेत. हदगाव तालुक्याचे भौगोलिक स्थान : अक्षवृत्तीय विस्तार १९° ३०’ ००’’ उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७७° ४०’ १२’’ पूर्व असे असून तालुक्याच्या उत्तर दिशेला उमरखेड तालुका तर दक्षिण दिशेला अर्धापूर तालुका आहे. हदगाव तालुक्याच्या उत्तर-पूर्वेला यवतमाळ जिल्हा सीमा असून उत्तर-पश्चिमेला हिंगोली जिल्ह्याची सीमा आहे आणि पूर्वेला हिमायतनगर तालुका आहे. २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १,०५५ चौ.कि.मी. एवढे असून हदगाव तालुक्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ८९९ मी. आहे.तालुक्याचा संपूर्ण भूभाग पठारी प्रदेश असून यामध्ये अनेक छोट्या मोठ्या डोंगररांगा आहेत. हदगाव तालुक्यामध्ये १४६ गावांची संख्या असून २,५९,९८६ एवढी लोकसंख्या आहे. हवामानाचा विचार करता २९°C एवढे सरासरी तापमान तर ७३% आर्द्रता आढळते. तालुक्यामध्ये सरासरी ९७७ मिली मी. एवढे पर्जन्य पडते.

या सोबतच प्रस्तुत अभ्यास क्षेत्रातील अर्धापूर तालुक्याची निर्मिती ३० डिसेंबर १९९९ मध्ये नांदेड तालुक्यातून करण्यात आलेली असून तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १९,२१९ चौ.कि.मी. एवढे असून २०११ च्या जनगणनेनुसार १,०९,३३२ एवढी लोकसंख्या व ५६ गावे तालुक्यात आहेत. भौगोलिक स्थानाचा विचार करता तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९° १७’ ४४’’ उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७७° २२’ ५२’’ पूर्व या दरम्यान आहे. तालुक्याच्या पूर्वेला भोकर, पश्चिमेला परभणी जिल्हा, दक्षिणेला नांदेड व उत्तरेला हदगाव तालुक्याच्या सीमा आहेत. केळी या नगदी पिकासाठी प्रसिद्ध असणा-या या तालुक्यात कापूस, ऊस, हळद व सोयाबीन हे प्रमुख पिके घेतली जातात.

१.३ उद्दिष्ट्ये :

१) हदगाव व अर्धापूर व अर्धापूर तालुक्यांचा प्राकृतिक सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक रचनेचा अभ्यास करणे.

२) हदगाव व अर्धापूर तालुक्यांचा लोकसंख्याशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

३) हदगाव तालुक्यातील लोकसंख्येचे स्थलांतर, स्थलांतराची कारणे आणि त्यांच्या परिणामाचा अभ्यास करणे.

४) हदगाव व अर्धापूर तालुक्यातील वस्त्यांच्या वितरणाचा अभ्यास करणे.

५) हदगाव व अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारुप यांचा अभ्यास करणे.

६) हदगाव व अर्धापूर तालुक्यातील वस्त्यांचे स्थान, स्थिती व कार्य यांचा अभ्यास करणे.

०७) हदगाव व अर्धापूर तालुक्यातील काही गावांचा क्षेत्र अभ्यास करणे.

१.४ गृहितके :

१) तालुका स्थळाच्या ठिकाणी लोकसंख्या मध्यम असते.

२) शहरी किंवा नागरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात लोकसंख्येची घनता व साक्षरता कमी असते.

३) ग्रामीण ते शहरी लोकसंख्येच्या स्थलांतरावर प्रामुख्याने आर्थिक व रोजगार विषयक घटक कारणीभूत असतात.

४) ग्रामीण वस्तीचा आकार आणि ग्रामीण वस्तीमधील अंतर सर्व ठिकाणी सारखे नसते.

५) ग्रामीण वस्तीची उत्पत्ती अनुकूल नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता असलेल्या ठिकाणी होत असते.

६) वस्तीची वाढ सर्व ठिकाणी समान नसते, नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या अनुकलूतेवर अवलंबून असते.

१.५ संशोधन पद्धती :

ग्रामीण वस्त्यांच्या संदर्भात सखोल माहिती जाणून घेण्यासाठी विविध सूत्रांचा वापर केला जाणार आहे. तसेच आकडेवारीची सारणी, विविध नकाशे व शास्त्रीय पद्धतीचा वापर केला जाईल.

वस्ती व लोकसंख्या या घटकाला अनुसरुन खालील सूत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

ग्रामीण वस्तीतील अंतर काढण्यासाठी खालील सूत्र वापरले जाईल.

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

जसे : D = सरासरी अंतर

A = एकूण क्षेत्रफळ

N = वस्तींची संख्या

ग्रामीण वस्तीतील लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी खालील सांख्यिकी सूत्राचा वापर करणार आहे.

$$S = \frac{P}{N}$$

जसे : S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = ग्रामीण लोकसंख्या

N = ग्रामीण वस्तींची संख्या

ग्रामीण वस्त्यांचे प्रकार ठरवण्यासाठी राम बली सिंह यांच्या सूत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

१) Hn ……… = Vn = दाट (compact)

२) Hn…….. = Vn + 1 to Vn x 2 = विरळ (semi-compact)

३) Hn……. = Vn + 2 + 1 to $\frac{ovn\ x\ 2}{3}$ = पुरवायुक्त

४) Hn = …… $\frac{ovn\ x\ 2 + 1}{3}$ to ovn = प्रकिणी (Dispersed)

Hn = पुरवेची संख्या

Vn = गावाची संख्या

Oum = अधिगृहीत घरांची संख्या

१.६ माहिती संकलन :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्वरुपाची माहीती आणि आकडेवारी वापरण्यात येणार आहे. प्राथमिक माहितीसाठी ग्रामीण व शहरी वस्त्यांचे सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येणार आहे. ग्रामीण वस्त्यांच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास निवडक गावांना भेटी देवून करणार आहे.

दुय्यम स्वरुपाच्या माहिती व आकडेवारीसाठी जिल्हा समालोचन संशोधन अहवाल, कृषी अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, भारतीय स्थल निर्देशक नकाशा, गुगल अर्थ वेबसाईट व इतर संशोधन विषयाशी संबंधित वेबसाईट इत्यादी स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

संकलीत माहितीचे विश्लेषण करण्यासाठी माहितीनुरुप नकाशे तयार करण्यात येणार आहेत. तसेच आकडेवारीनुसार विविध आलेखाच्या साह्याने माहीतीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

१.७ साहित्याचे पुनरावलोकन :

मानवी संस्कृतीचा मूर्त आविष्कार म्हणून ओळखला जाणा-या वस्त्यामधील वैविध्यपूर्ण घटक परस्परावलंबी व गतिशील असतात. **कु. एलन सेंपल (१९१४)** या विदुषीच्या भूगोलशास्त्राच्या व्याख्येप्रमाण ‘मानव हा गतिशील गटक आणि वस्ती ही मानवी संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण प्रतिक आहे’.

पृथ्वीचे भौगोलीक व्यक्तिमत्व देखील अस्थिर असल्याने व मानव हा चंचल आणि गतिशील प्राणी असल्याकारणाने मानवी वस्त्या देखील स्थल व कालानुरुप बदलत आहेत.

‘हडसन (१९७६)’ या भूगोल तज्ञाने वस्त्यांना सजीवांची उपमा दिली आहे. (settlements are like living organization) ही उपमा वस्तीभूगोलाचे स्वरुप प्रदर्शित करते. कारण प्रत्येक वस्ती सजीवाप्रमाणेच उद्‌गम (जन्म) वाढ (विकास),-हास (अंत) अशा अवस्थामधून जात असते.लोकसंख्या आणि मानवी वस्त्यांच्या संशोधनात्मक अभ्यास अनेक वर्षापासून वैश्विक, देश, राज्य व स्तानिक पातळीवर करण्यात येत आहे. याची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

जीन ब्रुन्हस (१९१०) यांनी मानवी भूगोल या पुस्तकाच्या प्रथम खंडामध्ये घरांची निर्मिती, ग्रामीण व नागरी वस्तींची स्थिती आणि प्रारुप यांचे विश्लेषण केले आहे. **‘आरुशो (१९२०)’** यांनी ‘ग्रामीण लोकसंख्येची व्यवस्था’ या लघुशोध निबंधामध्येग्रामीण वस्तींच्या विविध प्रारुपांचा, लोकसंख्येच्या रचनेचा अभ्यास केलेला आहे. **‘मार्टिनी (१९२८)’** या भूगोल तज्ञाने प्राकृतिक घटकाला अनुसरुन वसाहतीचे वितरण, घराचे प्रकार व आकार या घटकावर संशोधन केलेले आहे. **‘दिमांजिया (१९२०)’** यांनी कृषी क्षेत्रावरचे भूस्वामित्व, घरांचे प्रकार, बांधकाम साहित्य व घरांचे वितरण इत्यादी घटकांचा अभ्यास केलेला आहे. **‘गौतम भट्टाचार्य आणि अंजना देसाई’** यांनी गुजरात राज्यातील भाल या किनारी प्रदेशातील ग्रामीण वस्तींच्या विकास व समस्यांचा अभ्यास केलेला आहे. या लेकामध्ये ग्रामीण वस्तीच्या विकासामध्ये अडचणी निर्माण करणा-या पर्यावरणीय समस्यांचे विश्लेषण केलेले आहे. ‘डॉ. के. बी. कनकुरे (१९८६)’ (अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध पुणे विद्यापीठ) यांनी मराठवाड्यातील ग्रामीण व नागरी वस्त्यांचा संशोधनात्मक अभ्यास केलेला आहे. या संशोदनात्मक अभ्यासामध्ये मराठवाड्यातील वस्तींच्या उत्क्रांतीपासून ते १९८६ पर्यंत वस्तीमध्ये झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केलेले आहे.

१.८ प्रस्तावित कामाची योजना :

- **प्रथम वर्ष योजना**

१) साहित्याचे पुनरावलोकन :

प्रस्तावित संशोधन कार्याच्या माहितीसाठी संबंधित विषयावरील प्रकाशित साहित्याचे पुनरावलोकन तसेच अभ्यासासाठी विशिष्ट संशोधन आणि संस्था यांच्या अप्रकाशित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

२) फिल्ड वर्क आणि माहितीचे संकलन :

विविध दुय्यम स्त्रोतांकडून माहीती गोळा केली जाईल आणि फिल्ड वर्क व इतर संशोधनाच्या मदतीने प्राथमिक माहिती गोळा केली जाईल.

- **द्वितीय वर्ष योजना**

प्रस्तुत संशोधनाशी संबंधित संग्रहित माहितीचे विश्लेषण नकाशाशास्त्रीय पद्धतीने केले जाईल.

- **तृतीय वर्ष योजना**

१) स्पष्टीकरण केलेल्या माहितीचे व्यवस्थित व्याख्यांतर करणे व माहितीला योग्य स्वरुपात मांडले जाईल.

२) संशोधन प्रबंधाचे लिखाण आणि सादरीकरण :

संकलित आणि विश्लेषण केलेल्या माहितीचा अर्थ आणि उद्दिष्टांच्या उपलब्धतेनंतर योग्य निष्कर्ष व उपाययोजना मांडून प्रबंध लिहीला जाईल. आणि तिस-या वर्षाच्या शेवटी प्रस्तुत विद्यापीठास सादर केला जाईल.

१.९ प्रकरण योजना :

प्रस्तुत **''हदगाव व अर्धापूर तालुक्यातील लोकसंख्या व वसाहतीचा भौगोलिक अभ्यास''** या शीर्षकाखालील संशोधन कार्य पुढील आठ (८) प्रकरणामध्ये विभागले जाणार आहे.

१) प्रकरण पहिले :

प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना, लोकसंख्या व वस्तीभूगोल शाखेची ओळख, संबंधित संशोधन विषयाचा पूर्व अभ्यास, संशोधन कार्याची उद्दिष्टे संशोधन पद्धती, गृहितके, नकाशाशास्त्रीय पद्धती इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

२) प्रकरण दुसरे :

'हदगाव व अर्धापूर तालुक्याची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना'

दुस-या प्रकरणामध्ये हदगाव व अर्धापूर तालुक्याची भूरचना, पर्जन्य, तापमान, नदीप्रणाली, वारे, मृदा व वनस्पती वाहतूक व दळणवळण, भूमी उपयोजन इत्यादी घटकाचा अभ्यास केला जाईल.

३) प्रकरण तिसरे :

'हदगाव व अर्धापूर तालुक्याचा लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास'

या प्रकरणामध्ये लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येचे प्रमाण, लोकसंख्येची घनता, लिंग गुणोत्तर, साक्षरता इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाईल.

४) प्रकरण चौथे :

'लोकसंख्येचे स्थलांतर'

या प्रकरणामध्ये लोकसंख्येचे स्थलांतर त्यामागची कारणे व परिणाम इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

५) प्रकरण पाचवे :

'वस्त्यांचे वितरण आणि वितरणावर परिणाम करणारे घटक'

या प्रकरणामध्ये वसाहतीचे वितरण व वस्त्यांच्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक व मानवनिर्मित घटक याचा अभ्यास केला जाईल.

६) प्रकरण सहावे :

‘वस्त्यांचे स्थान आणि स्थिती’

या प्रकरणामध्ये वस्त्यांचे स्थान (site) व स्थिती (situation) यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

७) प्रकरण सातवे :

‘वस्त्यांचे प्रकार, प्रारुप आणि कार्य’

या प्रकरणामध्ये वस्त्यांचे प्रकार (Types), वस्त्यांचे प्रारुप (Pattern) व वस्त्यांची कार्य (function) इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाईल.

८) प्रकरण आठवे :

‘निष्कर्ष आणि उपाययोजना’

१.१० संदर्भ :

1) अहीरराव, वा. र. (१९९७) : अधिवास भूविज्ञान, निराली प्रकासन, पुणे, पृ. क्र. १, ९.

2) पेंडसे, एस. डी. (१९६५), : महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पृ. क्र. ११०, ११५.

3) जिल्हा जनगणना अहवाल : १९९१-२००१ आणि २०११.

4) वर्मा, लक्ष्मिनारायण व्ही. (१९८३) : अधिवास भूगोल, पृ. क्र. २३, २५.

5) उपाध्याय, दिनकर प. (१९९१) : ग्रामीण वस्ती भूगोल, पृ. क्र. ७०, ७५.

6) सामाजिक व आर्थिक समालोचन, २०११-२०१२.

7) भारतीय स्थलदर्शक नकाशा.

8) Aaroussean. M. (1920) : The arrangement of Rural Population, Geographical Reviews, Vol.-10, P. No. 223.

9) Ahmad, E. (1952) : Rural settlement types in the Uttar Pradesh, Annals. A.A. Geography, P. No. 222, 246.

10) https :// nanded.gov.in

संशोधक

नरवाडे मदन विठ्ठल
(M.A., B.Ed., NET)
कै.शंकरराव गुट्टे ग्रामीण वरिष्ठ महाविद्यालय,
धर्मापूरी ता. परळी (वै.) जि. बीड-४३१५१५

मार्गदर्शक

डॉ. गौंड नामदेव संपतराव
(M.A., B.Ed., M.Phil., Ph.D.)
भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय,
चाकूर ता. चाकूर जि. लातूर-४१३५१३